Today गोंदिया
सकाळ
गुरुवार ३
२ ऑगस्ट २०१८

# खस, बांबू लागवडीचे शेतकऱ्यांना प्रशिक्षण

**गोंदिया, ता.१ :** हिवरा येथील कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांना खस, गवत व बांबू लागवडीकरिता प्रशिक्षण कार्यक्रम विज्ञान केंद्रात घेण्यात आला.



**गोंदिया : कार्यक्रमात बोलताना समन्वयक डॉ. एन. एस. देशमुख.**

जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांकडे पडीक जमिनी आहेत. त्यांनी शेताच्या बांधावर बांबू लागवड करावी, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक डॉ. एन. एस. देशमुख यांनी केले. त्याचप्रमाणे खस, गवत ही आपल्या भागात आढळणारी सुगंधी वनस्पती आहे. याचीसुद्धा लागवड शेतकऱ्यांनी करून आर्थिक उत्पन्नात वाढ करावी, असे आवाहनदेखील त्यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. ओ. बावकार यांनी बांबू लागवड व लागवडीयोग्य प्रजाती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या वेळी बांबू लागवडीचा शेतकऱ्यांमध्ये अधिक प्रचार व्हावा, याकरिता कृषी विज्ञान केंद्र परिसरात बांबूच्या रोपांची लागवड करण्यात आली. यशस्वितेसाठी मनोज भोमटे, श्रीमती एस. जी. पवार, गणेश खेडीकर, सोमनाथ गवते, आर. पी. चव्हाण, पी. एन. रामटेके यांनी सहकार्य केले.